| MHNS130010432024 | दाखल दिनांक | २४/०७/२०२४ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | २४/०७/२०२४ |
| | निकाल दिनांक | २३/०३/२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस<br>०१ ०७ २९ |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पिंपळगाव बसवंत, ता.निफाड जि.नाशिक यांचे न्यायालय**
**पिठासन अधिकारी - व्ही.डब्ल्यू.खेंदाड**
**न्यायनिर्णय**
**(दिनांक : २३ मार्च २०२६ अधिघोषित)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४६६/२०२४** **निशाणी क्र.०८ पुढे**

**सरकारतर्फे पिंपळगाव पोलीस स्टेशन वि. नामदेव रमेश जाधव**

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) प्रमाणे प्रतिकथन निशाणी क्र.०८ अन्वये नोंदविला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून प्रकरण चालविण्याची मागणी केली. अभियोग पक्षातर्फे नउ साक्षीदारांपैकी केवळ एक पंच साक्षीदार तपासण्यात आला. तदनंतर अभियोग पक्षास संधी देवूनही अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकामी इतर कोणतेही साक्षीदार न्यायालयात उपस्थित ठेवलेले नाही. करिता अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविल्यानंतर आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा आलेला नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये जबानी नोंदविण्यात आली नाही.

२. अभियोग पक्षाच्या कथनावरून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष मी खालीप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२८.०६.२०२१ रोजी भाग्योदय ढाब्याच्या | |

| | | |
|---|---|---|
| | आडोशाला मा.शरद पवार मार्केटसमोर जोपुळरोड, पिंपळगाव (ब), ता.निफाड, जि.नाशिक येथे आरोपी बेकायदेशीर विना परवाना देशी दारू प्रिन्स संत्राच्या १८० मिली मापाच्या एकूण १९ सिलबंद बाटल्या प्रत्येकी किंमत रू.७०/- असा एकूण किंमत रू.१३३०/- असा प्रोव्हीबीशनचा मुद्देमाल जवळ बाळगुन, तिची चोरटया रितीने विक्री करतांना मिळून आला ? | **..नकारार्थी** |
| २. | अंतिम आदेश काय? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

**३.** अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.एस.एल.जोरवर व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.पी.बी.हाडोळे यांचा युक्तीवाद ऐकला. पटलावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपीने त्याच्या बचावाच्या पृष्टयर्थ तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केलेला नाही.

## **:: कारणमिमांसा ::**

**मुद्दा क्र. १ व २ करिता :**

**४.** आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकामी आरोपी हा दारूबंदी गुन्हयाचा माल विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगतांना मिळून आला, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

**५.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार - सुजित मनोहर आकडे (सा.क्र.१) हे पंच साक्षीदार असून त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने त्यांचा उलटतपास घेतला. परंतु त्यातही अभियोग पक्षास सदर साक्षीदारांकडून आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत होईल असे काही एक उद्युक्त करून घेता आलेले नाही. करिता सदर साक्षीदाराची साक्ष आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकामी उपयुक्त अशी नाही.

६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी, प्रत्यक्ष साक्षीदार, घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करणारे व गुन्हयाचा तपास करणारे तपास अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. परिणामत: सदर दस्त तसेच तपासाशी निगडीत बाबी व अन्य दस्त सिध्द करण्यास देखील अभियोग पक्षास अपयश आलेले असल्याचे दिसून येते. तसेच सदर आरोपीच्या ताब्यातून कथित मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची बाब स्वतंत्रपणे सिध्द करण्यास देखील अभियोग पक्षास अपयश आलेले आहे.

७. अभियोग पक्षास संधी देवूनही त्यांनी इतर साक्षीदार तपासलेले नाहीत व रासायनिक पृथ्थकरणाचा अभिप्राय अभिलेखावर सादर केलेला नाही. आरोपीच्या ताब्यातून प्रिन्स संत्रा देशी दारूच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या १९ सिलबंद बाटल्या मिळून आल्या असे गृहित धरले तरी, जप्त बाटल्यांमध्ये दारूच होती हे सिध्द करण्याकरीता रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे जप्त केलेल्या बाटल्यांमध्ये दारूच होती हे सिध्द झाले असे म्हणता येणार नाही. परिणामत: आरोपीवरील गुन्हा सिध्द होत नसल्याने तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. तसेच सदर गुन्हयामध्ये जप्त मुद्देमाल नियमाप्रमाणे नष्ट करणे योग्य होईल. करीता मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे व मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश करित आहे :-

## आदेश

१. आरोपी **नामदेव रमेश जाधव** याची फौ.प्र.सं.कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गतच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जामिन कदबा व बंधपत्र रद्द करण्यात येवून जामिनदारास बंधमुक्त करण्यात येते.

३. तपास अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, जप्त मुद्देमाल अपिल कालावधीनंतर नियमानुसार नाश करण्याकरीता संबंधित दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे निकटतम अपील न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी आरोपीने र.रू.१५,०००/- चे जातमुचलका व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

सही /-xxx
(व्ही. डब्ल्यू. खेंदाड)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपळगाव (ब) जि.नाशिक

दिनांक : २३/०३/२०२६
ठिकाण : पिंपळगाव (ब)

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

लघुलेखकाचे नांव — श्रीमती गावित.
न्यायालयाचे नाव — न्यायदंडाधिकारी वर्ग १, पिंपळगाव(ब), ता.निफाड, जि. नाशिक
आदेश दिनांक : २३/०३/२०२६.
पिठासीन अधिका—यानी स्वाक्षरी केलेली तारीख : २३/०३/२०२६.
आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख : २४/०३/२०२६.

**(टिप : डिजीटल सिग्नेचर मिळालेली नसल्याने न्यायनिर्णय डिजीटल स्वाक्षरीत केला नाही. )**